# विद्यापीठात वीज, पाणी, इंधन बचतीचे धडे

## पर्यावरणशास्त्र विभागाकडून ऑडिट सुरू; सौर ऊर्जा निर्मितीचा लाभ होणार

▮ कोल्हापूर / वैभव गोंधळी :

**शिवाजी विद्यापीठातील निवासस्थाने, विविध अधिविभाग, जलस्रोत, घनकचरा, हवा, तसेच इमारतीचे पर्यावरणीयदृष्ट्या ऑडिट सध्या सुरू आहे. पर्यावरणशास्त्र विभागाकडून हे ऑडिट केले जात असून, शिवाजी विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना वीज, पाणी तसेच इंधन बचतीसाठी उपाययोजना सुचवल्या जाणार आहेत.**

शिवाजी विद्यापीठामध्ये जलक्रांतीनंतर आता ऊर्जा क्रांती सुरू आहे. त्या अंतर्गत शिवाजी विद्यापीठामध्ये आवश्यक असणारी वीज सौर ऊर्जाद्वारे तयार केली जाणार आहे. एकूण ८५३ एकर परिसरात दुर्मीळ वृक्ष संपदा, जलस्रोत, विद्यापीठातील विविध अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची निवासस्थाने आहेत. विविध अधिविभागासह प्रशासकीय इमरतींची ही संख्या मोठी आहे. या सर्व इमारतींमध्ये मोठ्या प्रमाणात वीज आणि पाण्याचा वापर होत असतो. त्याचबरोबर प्रशस्त अशा विद्यापीठाच्या परिसरात विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांकडून दुचाकी आणि चारचाकी वाहनांचा ही वापर केला जातो.

विद्यापीठ हे अधिकाधिक पर्यावरणपूरक करण्याकडे विद्यापीठ प्रशासनाचे प्रयत्न गेल्या काही वर्षांपासून सुरू आहेत.



त्या अंतर्गत विद्यापीठास पाण्याच्या बाबतीमध्ये स्वावलंबी बनविण्यात आले. विजेच्या बाबतीमध्ये विद्यापीठास स्वयंपूर्ण बनवण्यासाठी सौर ऊर्जा निर्मिती सुरू करण्यात आली आहे. येत्या दोन वर्षांमध्ये विजेच्या बाबतीमध्ये विद्यापीठास स्वावलंबी बनविण्याचा विद्यापीठ प्रशासनाचा मानस आहे.

'विजेची बचत हीच विजेची निर्मिती', असे मानले जाते. त्यानुसार विजेची अधिकाधिक बचत व्हावी यासाठी विद्यापीठामध्य वापरल्या जाणाऱ्या विजेचा अभ्यास सध्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांकडून केला जात आहे. वापरल्या जाणाऱ्या पाण्याचाही अभ्यास केला जात आहे. या अभ्यासातून येणारया आकडेवारीतून वीज आणि पाण्याचा वापर कमी करता येईल, अशा विभागांना त्यासाठी उपाया योजना सुचविल्या जाणार आहेत.

▶▶ पान २ वर

### पर्यावरणपूरक उपक्रम



शिवाजी विद्यापीठाचा परिसर हा पर्यावरणपूरक परिसर म्हणून ओळखला जातो. तरीही आपण त्याचे ऑडिट करीत आहोत, यामधून काही कमतरता समोर आल्या तर त्यावर आपल्याला उपाययोजना करता येतील. या ऑडिटमध्ये सर्व प्रकारचे ऑडिट करण्यात येत आहे. ही एक चांगली प्रक्रिया आहे. आधिपासूनच पर्यावरणपूरक असलेले विद्यापीठ अधिक पर्यावरणपूरक होईल.

– डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू

# विद्यापीठात वीज, पाणी, इंधन बचतीचे धडे

वीज, पाणी आणि इंथनामध्ये बचत व्हावी यासाठी पर्यावरण शास्त्र विभागाचे विद्यार्थी अभ्यास करत आहेत. त्यामध्ये विद्यापीठातीत कर्मचारी आणि विद्यार्थी प्रतिदिन सरासरी किती कि.मी. आपले वाहन विद्यापीठ परिसरात वापरतात, त्यामुळे किती कार्बनचे उत्सर्जन होते यांची नोंद घेतली जात आहे. महिन्यातून एक वेळा विद्यापीठात पाळल्या जणाऱ्या 'नो व्हेईकल डे'मध्ये किती इंधन बचत होते, याची आकडेवारी ही काढली जात आहे. या आकडेवारीतून इंधन बचतीचे मार्ग सुचविले जाणार आहेत. विद्यापीठातील घनकचरा, हवा, विद्यापीठ परिसरातील जलस्रोत, परिसरातील वृक्षाची कार्बन शोषण्याची क्षमता आदींचा ही अभ्यास केला जाणार आहे. प्रथम पाहणी, त्यानंतर त्याची तौलनिक मांडणी, उपयायोजना आणि त्यानंतर प्रत्यक्ष अंमलबजावणी अशी मोठी प्रक्रिया यामध्ये पार पाडली जाणार आहे. असे असले तरी विद्यापीठ अधिकाधिक पर्यावरणपूरक करण्यासाठीचे हे महत्त्वाचे पाउल आहे.

पुढारी

# विद्यापीठाचा सीएसआयआर-एनसीएलशी सामंजस्य करार

## उत्कृष्ट संशोधनासाठी संयुक्त प्रकल्पांची गरज : डॉ. वडगावकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्रयोगशाळेत संशोधकाने एकट्याने संशोधन करण्याचे दिवस आता मागे पडले असून, उत्कृष्टसंशोधनकार्यासाठी विविध संस्थांनी संयुक्त प्रकल्प हाती घेण्याची गरज आहे. यादृष्टीने शिवाजी विद्यापीठ आणि सीएसआयआर-एनसीएल यांच्यातील सामंजस्य करार दोन्ही संस्थांसाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास पुण्याच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे (एनसीएल) मुख्यशास्त्रज्ञ डॉ. पी. पी. वडगावकर यांनी शुक्रवारी येथे व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठ आणि सीएसआयआर-एनसीएल यांच्यात शुक्रवारी संशोधनविषयक सहकार्याचा सामंजस्य करार झाला. त्यावेळी ते बोलत होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने सीएसआयआर-एनसीएलशी सामंजस्य करार केला. यावेळी उपस्थित डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. पी. पी. वडगावकर, डॉ. अकल्पिता अरविंदेकर, डॉ. पी. डी. राऊत व इतर.**

डॉ. वडगावकर म्हणाले, उत्कृष्ट संशोधनासाठी संयुक्त प्रकल्प हाती घेणे आज आवश्यक झाले आहे. त्यासाठी संशोधन संस्थांनी व यामधील संशोधकांनी एकत्र येऊन एकमेकांशी चांगला परिचय करून घेतला पाहिजे. आपापल्या संशोधन क्षेत्राची माहिती एकमेकांना दिली पाहिजे. त्यातून संशोधनाच्या नवनव्या संधी उपलब्ध होतील. यामध्ये आंतरविद्याशाखीय संशोधन प्रकल्पांचेही महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, या सामंजस्य करारामुळे संशोधन, संयुक्त प्रकल्प, प्रयोगशाळा सहकार्य या बाबींविषयी एनसीएलबरोबर संवाद आणि साहचर्य वाढेलच; पण त्याचबरोबर आपल्या संशोधनाचे पेटंट मिळविण्याच्या कामी एनसीएलच्या अनुभवी संशोधकांचे मार्गदर्शन विद्यापीठाच्या संशोधकांना लाभेल. त्याचप्रमाणे संशोधनाचे तंत्रज्ञानात रुपांतरण आणि औद्योगिक साहचर्य वृद्धी या दृष्टीनेही त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी, तर एनसीएलच्या वतीने डॉ. वडगावकर यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. अकल्पिता अरविंदेकर, डॉ. जे. एस. बागी यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक उपस्थित होते.

लोकमत

# 'जैविक विज्ञान संशोधन'वरील कार्यशाळा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभागात 'जैविक विज्ञान संशोधन आणि विकासाची संधी' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात झाली.

कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी दक्षिण आफ्रिकेतील दर्बन येथील युनिव्हर्सिटी ऑफ क्वॉझुलू नातालचे डॉ. राजशेखर करपूरमथ व डॉ. ए. यू. आरविंदेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यशाळेत डॉ. राजशेखर करपूरमथ, दक्षिण कोरिया येथील डॉन्युक विद्यापीठाचे डॉ. गजानन घोडके, पोस्ट डॉक फेलो, तैवानचे डॉ. गणेश कांबळे यांनी विद्यार्थ्यांना 'आर अॅण्ड डी अप्पॉरच्युनिटीज इन बायोलॉजिकल सायन्सेस' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे समन्वयक म्हणून डॉ. के. डी. सोनवणे यांनी काम पाहिले.